*“जेवण माझ्या चॉईसचं, आणि मूव्ही तुझ्या! मी अनुयाला चार वाजता पिकप करते , घरी आणते, आणि पुन्हा तिला तयार करून तिचं डिनर आणि रात्रीचे कपडे पॅक करून बरोबर सव्वापाचला तयार राहते!”*

*“मला त्या रेस्टॉरंटचा पत्ता टेक्स्ट करून ठेव. मी उद्या त्याच्या जवळ कुठलं मल्टिप्लेक्स आहे ते शोधून कितीचा शो आहे ते बघतो आणि त्याप्रमाणं डिनर रिझर्वेशन करून ठेवतो म्हणजे शुक्रवारचा तेवढा वेळ वाचेल.”*

*“पण  तू पाच-सव्वापाचच्या आसपास घरी ये, म्हणजे आपण लगेचच निघू. उशीर करू नको, ओके?”*

*“इट्स अ डेट!” दोघं एकमेकांकडं बघून हसले आणि आपापलं काम करू लागले.*

अतिशय बिझी जॉब्ज आणि लहान मुलगी यात पूर्णपणे गुंतलेल्या जोडप्याला अचानक एका ‘डेट नाईट’ ची संधी मिळते, त्याची कथा.